तरुण भारत

# स्मृतीदिनी शंभर सेकंद स्तब्ध राहून शाहूंना अभिवादन करा

प्रतिनिधी
कोल्हापूर

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे महाविद्यालयांना आवाहन

शिक्षणाची ज्ञानगंगा गोरगरीब, वंचित, बहुजनांच्या घराघरात पोहचवण्याचे काम राजर्षी शाहू महाराज यांनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या प्रती कृतज्ञता म्हणून ६ मे रोजी सकाळी १० वाजता शंभर सेकंद स्तब्धता पाळून अभिवादन करावे. सर्व अधिविभाग, महाविद्यालय आणि समाजातील प्रत्येक घटकाने शंभर सेकंद आदरांजलीचे, शाहूरायाप्रती कृतज्ञतेचे पाळावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त २२ मे पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सांस्कृतिक, शैक्षणिक, चित्रप्रदर्शन, छायाचित्रप्रदर्शन, कथाकथन, प्रश्नमंजुषा आशा अनेक कार्यक्रमांनी लोकराजाला अभिवादन पर्व सुरू आहे. तरी ६ मे रोजी सकाळी १० वाजता शंभर सेकंद स्तब्धता पाळून या लोकराजाविषयी कृतज्ञता पाळावे, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
27 APR 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शंभर सेकंद आदरांजलीचे शाहूरायांप्रती कृतज्ञतेचे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये, अधिविभागांतील विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यासह पालकांनी ६ मे रोजी सकाळी १० वाजता शंभर सेकंद स्तब्धता पाळून लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

जिल्हा प्रशासनाने राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त २२ मेपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणाची ज्ञानगंगा गोरगरीब, वंचित शोषित यांच्या घराघरांत नेण्यासाठी अथक प्रयत्न केले. लोकराजाप्रती कृतज्ञता म्हणून ६ मे रोजी सकाळी दहा वा. शंभर सेकंद स्तब्धता पाळून लोकराजास अभिवादन करणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

लोकमत

# महाराष्ट्रात परीक्षा ऑफलाईनच : सामंत

लोकमत न्यूज नेटवर्क

रत्नागिरी : कोरोनाकाळात आरोग्याचा मुद्दा लक्षात घेऊन परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्याचे धाडस महाविकास आघाडी सरकारने दाखविले. मात्र, विद्यार्थ्यांच्या करियरचा विचार करता आता ऑफलाईन परीक्षाच गरजेच्या आहेत. राज्यातील विद्यापीठांचे कुलगुरूही ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यावर ठाम आहेत. त्यामुळे आता सर्वच विद्यापीठांकडून ऑफलाईन परीक्षाच घेतल्या जाणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

रत्नागिरीमध्ये कौशल्य विकास केंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने आता ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याची तयारी विद्यापीठांकडून करण्यात येत आहे. मात्र, विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन परीक्षेची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक घेतली. या बैठकीमध्ये ऑफलाईन परीक्षा घेण्यावरच सर्व कुलगुरूंनी भर दिला. त्यामुळे तो अंतिम निर्णय घेण्यात आल्याचे ते म्हणाले.

ज्यावेळी गरज होती, तेव्हा सरकारने परीक्षा रद्दही केल्या. मात्र, आता परिस्थिती निवळली आहे. ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण झालेले तरुण आम्हाला नकोत, अशी भूमिका उद्योगजगताची आहे. त्यामुळे लाखो तरुणांच्या करियरचा विचार करून ऑफलाईन परीक्षांचा निर्णय घेतला.


## विद्यापीठाच्या परीक्षा १ जूनपासून

विद्यार्थ्यांनी केलेल्या मागणीनुसार परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना विद्यापीठ प्रश्न संच देणार आहोत. दोन पेपरमध्ये २ दिवसांचे अंतर ठेवले जाणार आहे. परीक्षा मेमध्ये न घेता १ जून ते १५ जुलैपर्यंत होतील, असे कुलगुरूंनी निश्चित केले आहे.

लोकसत्ता

# डॉ. जगन कराडे यांना पुरस्कार

**कोल्हापूर :** मराठी समाजशास्त्र परिषदेने या वर्षापासून समाजशास्त्र या विषयात शैक्षणिक भर घालणाऱ्या प्राध्यापकास डॉ. प्रदीप आगलावे उत्कृष्ट संशोधक, प्राध्यापक पुरस्कार तसेच आयसीएसएसआर व विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत संशोधक ग्रंथास डॉ. सूर्यकांत घुगरे संशोधक ग्रंथ पुरस्कार देण्याचे ठरवले आहे. पहिल्या पुरस्कारासाठी शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे तर दुसऱ्या पुरस्कारासाठी त्यांचे 'ऑक्युपेशनल मोबीलिटी अमंग शेड्युल्ड कास्ट' पुस्तक पात्र ठरले. ज्येष्ठ समाजसास्त्रज्ञ डॉ. पी. जी. जोगदंड यांच्या हस्ते त्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्राचार्य डॉ. पी. पी. कुलकर्णी, परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे उपस्थित होते. डॉ. कराडे यांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर बारा संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.



27 APR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रशिया-युक्रेन युद्धाचे जगावर दूरगामी परिणाम : डॉ. चौसाळकर

## शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

युरोपात सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध २१ व्या शतकातील सर्वात मोठे युद्ध असून, भारतासह जगभरावर त्याचे दूरगामी परिणाम होतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी व्यक्त केले.

दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत 'आजादी का अमृत महोत्सव' व शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवानिमित्त राज्यशास्त्र विषयांतर्गत 'भारतातील बदलते राजकीय अंतरंग' विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेत 'रशिया-युक्रेन युद्ध : भारतावरील परिणाम' या विषयावर ते बोलत होते. केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे अध्यक्षस्थानी होते. उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, चंद्रकांत कोतमिरे प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे ग्रंथ भेट देऊन स्वागत करताना डॉ. डी. के. मोरे. डॉ. एस. एल. गायकवाड, डॉ. नितीन रणदिवे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

डॉ. चौसाळकर म्हणाले, युरोपच्या भूमीवर ७५ वर्षांनंतर प्रथमच युद्ध होत आहे. युद्धात कुणीही हस्तक्षेप करीत नसल्याने 'बळी तो कान पिळी' अशी अवस्था निर्माण झाली आहे. युद्धाने जागतिक राजकारणात मोठे बदल झाले आहेत. पेट्रोल, इंधन, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे व अन्नधान्य निर्यातीमुळे रशियाची अर्थव्यवस्था सुरळीत सुरू होती. युद्धामध्ये युरोपातील अनेक देशांचे हितसंबंध गुंतले आहेत. याचा भारतावर विशेष परिणाम होत आहे.

भारतातील खाद्यतेलाच्या किमती वाढत आहेत. या युद्धामुळे मनुष्य व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे विस्थापितांचा प्रश्न निर्माण झाला आहे. कोरोनानंतरच्या या युद्धामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत.

डॉ. एस. डी. भोसले यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. एस. एल. गायकवाड यांनी परिचय करून दिला. डॉ. पी. एन. देवळी यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

पुढारी

# दोन सत्रांच्या परीक्षांनंतर विद्यार्थ्यांची पात्रता तपासणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दोन सत्र परीक्षा झाल्यानंतर तिसऱ्या सत्राचे विविध अभ्यासक्रमांचे निकाल शिवाजी विद्यापीठाने राखून ठेवले. कारण दिले की, विद्यार्थ्यांनी पात्रतेसाठी आवश्यक ती कागदपत्रेच सादर केली नाहीत. त्यामुळे पहिल्या दोन सत्रांसाठी विद्यार्थी परीक्षेला पात्र नव्हते का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शिवाजी विद्यापीठाने अनेक विद्यार्थ्यांचे निकाल पात्रतेबाबत आवश्यक कागदपत्रे महाविद्यालयात जमा न केल्याने राखून ठेवल्याचे सांगण्यात आले. यातील अनेक विद्यार्थ्यांनी पहिल्या दोन सत्रांच्या परीक्षा दिल्या आहेत. त्यांचे निकालही लागले आहेत; मग आताच पात्रतेचा प्रश्न कुठून आला, अशी विचारणा विद्यार्थ्यांनी केली. तेव्हा महाविद्यालयातील लिपिकांनी अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेशावेळी कोणती कागदपत्रे जोडली नाहीत याची यादी सांगितली. अनेक विद्यार्थ्यांनी यातील कागदपत्रे जमा केलीत; पण लिपिकांना कामाच्या व्यापातून वेळ मिळत नाही. त्यामुळे कागदपत्रे जमा केली असली, तरी ती मिळाली नाहीत. दुसरी प्रत आणा, असे सांगितले. लिपिकांच्या हलगर्जीपणामुळे कागदपत्रे गहाळ झाल्याने त्याचा मनस्ताप विद्यार्थ्यांना भोगावा लागत आहे. आता ज्यांनी कागदपत्रे दिली आहेत त्यांचे तर किमान पुढच्या सत्राचे परीक्षा फॉर्म भरण्यापूर्वी निकाल जाहीर होणार का, असा प्रश्न विद्यार्थीवर्गातून उपस्थित होत आहे.

पुढारी

# विद्यापीठात उद्या कवी भागवत यांच्या साहित्यावर चर्चा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, मराठी अधिविभाग व मित्र सामाजिक प्रतिष्ठान, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठातील मराठी अधिविभागात कवी चारुदत्त भागवत यांच्या जयंतीनिमित्त 'चारुदत्त भागवत : कवी आणि कविता' या विषयावर साहित्य चर्चा आयोजित केली आहे. कवी चारुदत्त भागवत यांच्या कवितासंग्रहातील काही कवितांचे विभागातील विद्यार्थी वाचन करणार आहेत. समीक्षक प्रा. अविनाश सप्रे अध्यक्षस्थानी असणार आहेत.

27 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रशिया-युक्रेन युद्धाचे जगावर परिणाम होतील

## डॉ. अशोक चौसाळकर; दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे ऑनलाइन व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : युरोपात सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध एकविसाव्या शतकातील सर्वात मोठे युद्ध असून, भारतासह जगभरावर त्याचे दूरगामी परिणाम होतील, असे मत डॉ. अशोक चौसाळकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत 'आजादी का अमृत महोत्सव' आणि शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवानिमित्त राज्यशास्त्र विषयांतर्गत आयोजित "भारतातील बदलते राजकीय अंतरंग" या विशेष ऑनलाइन व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'रशिया - युक्रेन युद्ध- भारतावरील परिणाम' हा विषय त्यांनी मांडला. केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे अध्यक्षस्थानी होते, तर उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, चंद्रकांत कोतमिरे प्रमुख उपस्थित होते.





**कोल्हापूर : अशोक चौसाळकर यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना डॉ. डी. के. मोरे. शेजारी डॉ. एस. एल. गायकवाड, डॉ. नितीन रणदिवे, चंद्रकांत कोतमिरे, डॉ. पी. एन. देवळी आदी.**

डॉ. चौसाळकर म्हणाले, 'युरोपच्या भूमीवर ७५ वर्षांनंतर प्रथमच युद्ध होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघ निर्माण झाला. या युद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघाची ताकद मर्यादित झाली. नाटोसारख्या संघटनांमध्ये सामील झाल्यास हल्ला होणार नाही, ही भावना युक्रेनची होती. युएन वा नाटोचा युक्रेन सदस्य नव्हता, परंतु यातील सदस्य राष्ट्रांशी त्याचे मित्रत्वाचे संबंध होते. तसेच, रशियाचे सत्ता सामर्थ्य वाढलेले होते. विस्तारवादाकडे रशियाचा कल होता.

गेल्या २०-२२ वर्षांच्या कालखंडात पुतीन यांचे साम्राज्य वाढत होते. अशातच या युद्धामध्ये कुणीही हस्तक्षेप करीत नाही. त्यामुळे बळी तो कान पिळी अशी अवस्था निर्माण झाली आहे.या युद्धामध्ये युरोपातील अनेक देशांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. याचा भारतावर विशेष परिणाम होत आहे. जैवतेलाच्या किंमतीत वाढ होत असून, महागाई वाढत आहे. भारतातील खाद्य तेलाच्या किमती वाढत आहेत. या युद्धामुळे मनुष्य व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे विस्थापितांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. कोरोनानंतरच्या या युद्धामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत.

डॉ. एस. डी. भोसले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. एस. एल. गायकवाड यांनी परिचय करून दिला. डॉ. पी. एन. देवळी यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

तरुण भारत

# महाविद्यालयाच्या परीक्षा ऑफलाईन

प्रतिनिधी
पुणे

राज्यातील विद्यापीठांचे कुलगुरू ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यावर ठाम आहेत. त्यामुळे १ जून ते १५ जुलैदरम्यान विद्यापीठांकडून परीक्षा घेतल्या जाणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी ट्विटरद्वारे दिली.

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने आता ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याची तयारी विद्यापीठांकडून करण्यात येत आहे. मात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन परीक्षेची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक घेतली. बैठकीनंतर सामंत यांनी ट्विटरद्वारे ही माहिती दिली.

कुलगुरूंच्या बैठकीमध्ये ऑफलाईन परीक्षा घेण्यासंदर्भात बहुसंख्य



- उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती
- १ जून ते १५ जुलैदरम्यान होणार परीक्षा

विद्यापीठ कुलगुरु ठाम आहेत. परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना प्रश्नसंच विद्यापीठ देणार आहे. दोन पेपरमध्ये दोन दिवसाचे अंतर असणार आहे, परीक्षा मे मध्ये न घेता १ जून ते १५ जुलै पर्यंत होतील, असे कुलगुरूंनी निश्चित केले आहे, असे उदय सामंत यांनी नमूद केले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ मराठी विभागात गुरूवारी साहित्यचर्चा

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग आणि सांगली येथील मित्र सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कवी कै. चारुदत्त भागवत यांच्या जन्मदिनी गुरूवारी २८ रोजी सकाळी ११ वाजता मराठी अधिविभागात साहित्यचर्चा कार्यक्रम होणार आहे. चर्चेत कणाद भागवत, डॉ. राहुल पुंगलिया, प्रा. शरद नावरे सहभागी होणार आहेत. अध्यक्षस्थानी समीक्षक प्रा. अविनाश सप्रे आहेत, अशी माहिती रणधीर शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 APR 2022
तरुण भारत

# महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या केंद्रांना भेटी

## अध्ययन, अध्यापनांतर्गत शिवाजी विद्यापीठाला भेट, विविध अधिविभागांची घेतली माहिती

कोल्हापूर

विविध सामाजिक, शैक्षणिक आणि प्रेरणादायी उपक्रमांमध्ये नेहमी अग्रेसर असणाऱ्या महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या वतीने, प्रशिक्षणार्थींनी २५ व २६ रोजी विविध ठिकाणी अभ्यास भेटी दिल्या. यामध्ये वनस्पतीशास्त्र विभाग, भाषा प्रयोगशाळा, नॅनो टेक्नॉलॉजी विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, अशा शिवाजी विद्यापीठातील विविध विभागांना प्रशिक्षणार्थींनी भेट देऊन संबंधित विभागाचे काम प्रत्यक्ष कसे चालते, हे पाहिले.

शहरातील ज्ञानप्रबोधन भवन संचलित आंधशाळा या ठिकाणी भेट देऊन ब्रेन लिपी, अंध वापरतात ती काठी, घुंगरू आदीबद्दल जाणून घेतले.




**कोल्हापूर : महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांनी बोटनिकल गार्डनला भेट दिली.**

जुनी–नवी पुस्तके, त्यांची मांडणी, आणि एकूणच ग्रंथालयाचे चालणारे प्रत्यक्ष कामकाज पाहण्यासाठी, बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी देखील भेट दिली.

या अभ्यास भेटीतून विविध संस्थांचे काम प्रत्यक्षात कसे चालते हे पाहता आले आणि यामुळे आमच्या ज्ञानात अजून भर पडली, अशा प्रतिक्रिया प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केल्या. या अभ्यास भेटीसाठी कॉलेजच्या प्राचार्या, डॉ. एस. डी. राणे, प्राध्यापिका ए. पी. क्षीरसागर, प्राध्यापिका डॉ. व्ही. ए. मोरे, प्राध्यापक एस. बी. बर्गे यांच्यासह भेटी दिलेल्या संस्थामधील प्रमुखांचे देखील मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.